Test Booklet Code & No.
प्रश्नपत्रिका कोड व क्र. **D**

# Paper-II
# ECONOMICS

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ....................................

(Name) ............................................

2. (Signature) ....................................

(Name) ............................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................
(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## MAY - 11216

**Time Allowed : 1¼ Hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **24** Number of Questions in this Booklet : **50**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **50** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-II will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 50 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी आवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरिक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# Economics
## Paper II
# अर्थशास्त्र
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** This Paper contains **Fifty (50)** multiple choice questions, each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पन्नास (50)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Real balance effect operates through :
   (A) Investment
   (B) Consumption
   (C) Taxes
   (D) Government spending

2. Friedman's demand for money function basically shows which one of the following statements :
   (A) Income velocity becomes a function of rate of interest and inflation
   (B) Income velocity becomes a function of money supply
   (C) Money demand always becomes an inelastic function
   (D) Money demand became independent of rate of return

1. वास्तव रोख शिल्लक परिणाम यामार्फत कार्य करतो :
   (A) गुंतवणूक
   (B) उपभोग
   (C) कर
   (D) सरकारी खर्च

2. फ्रीडमनचे पैशाचे मागणी फलन खालीलपैकी कुठले विधान मूलतः दर्शवतो ?
   (A) प्राप्ती परिचलन वेग हे व्याज दर आणि भावफुगवटा दर यांचे फलन होते
   (B) प्राप्ती परिचलन वेग हे पैशाच्या पुरवठ्याचे फलन होते
   (C) पैशाची मागणी नेहमीच अलवचीक फलन होते
   (D) पैशाची मागणी परताव्याच्या दराशी संबंधित नसते

3. Devaluation is resorted to :

(A) Encourage exports

(B) To increase the growth rate

(C) Give more value to home currency

(D) Tide over external difficulties

4. The International Monetary Fund started functioning on :

(A) 1st March, 1944

(B) 1st March, 1945

(C) 1st March, 1946

(D) 1st March, 1947

5. The country which produces maximum tea in the world is :

(A) India

(B) China

(C) Sri Lanka

(D) Japan

3. अवमूल्यन या कारणासाठी केले जाते :

(A) निर्यातीला चालना देण्यासाठी

(B) आर्थिक वृद्धीदर वाढविण्यासाठी

(C) देशीय चलनाला जास्त किंमत देण्यासाठी

(D) बाह्य अडचणींवर मात करण्यासाठी

4. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी खालील दिवशी कार्यरत झाले :

(A) 1 मार्च, 1944

(B) 1 मार्च, 1945

(C) 1 मार्च, 1946

(D) 1 मार्च, 1947

5. जगात चहाचे सर्वात जास्त उत्पादन हा देश करतो :

(A) भारत

(B) चीन

(C) श्रीलंका

(D) जपान

6. Which of the following markets are independently regulated by Forward Market Commission ?

(A) Mutual Funds

(B) Commodity Exchanges

(C) Stock Market

(D) Foreign Exchange Markets

7. In India, minimum support price for agricultural products is finally approved by :

(A) Union Cabinet

(B) Ministry of Agriculture

(C) The Parliament of India

(D) The President of India

8. Which state produces maximum Soyabean in India ?

(A) Uttar Pradesh

(B) Bihar

(C) Rajasthan

(D) Madhya Pradesh

6. वायदा बाजार आयोग खालीलपैकी कोणता बाजार (Market) स्वतंत्रपणे नियंत्रित करतो ?

(A) म्युच्युअल फंड

(B) वस्तू विनिमय

(C) भागभांडवल बाजार

(D) परकीय चलन बाजार

7. भारतात शेतमालाच्या किमान आधार किंमतीला मान्यता यांच्याकडून दिली जाते :

(A) केन्द्रीय मंत्रिमंडळ

(B) कृषी मंत्रालय

(C) भारताची संसद

(D) भारताचे राष्ट्रपती

8. भारतातील खालीलपैकी कुठल्या राज्यात सोयाबीनचे सर्वात जास्त उत्पादन होते ?

(A) उत्तरप्रदेश

(B) बिहार

(C) राजस्थान

(D) मध्यप्रदेश

9. The largest importer of Indian textiles is :

(A) Italy

(B) Germany

(C) Singapore

(D) USA

10. The market system fails to produce public goods because :

(A) There is no need or demand for such goods

(B) Private firms cannot restrict the benefits of such goods to consumers who are willing to pay for them

(C) Public enterprises can produce such goods at lower cost than private enterprises

(D) Their production seriously distorts the distribution of income

9. भारतीय वस्त्रांची सर्वात जास्त आयात ....... या देशाकडून होते.

(A) इटली

(B) जर्मनी

(C) सिंगापूर

(D) अमेरिका

10. बाजारयंत्रणा सार्वजनिक वस्तूंचे उत्पादन करण्यास अयशस्वी ठरते, कारण :

(A) या वस्तूंची गरज किंवा त्यांना मागणी नसते

(B) खाजगी उद्योगसंस्था अशा वस्तूंचे फायदे जे उपभोक्ते त्या वस्तूसाठी किंमत द्यायला तयार आहेत, त्यांच्यापुरते मर्यादित ठेवू शकत नाहीत

(C) सार्वजनिक उद्योगसंस्था अशा वस्तूंचे उत्पादन खाजगी उद्योगसंस्थांच्या खर्चाच्या तुलनेने कमी खर्चात करू शकतात

(D) त्यांच्या उत्पादनामुळे उत्पन्न वितरणात गंभीर विरूपण निर्माण होते

11. Under what conditions a monopolist's output is efficient ?
   (A) Third degree price discrimination
   (B) Second degree price discrimination
   (C) First degree price discrimination
   (D) When there is no price discrimination

12. A Pigouvian subsidy :
   (A) cannot exist with externalities
   (B) is the same thing as a Pigouvian tax
   (C) is measured in terms of Pigouvian dollars
   (D) moves production to the socially optimal level of output

11. मक्तेदारीतील उत्पादन खालीलपैकी कोणत्या परिस्थितीत कार्यक्षम असते ?
   (A) तृतीय प्रमाण मूल्यभेद
   (B) द्वितीय प्रमाण मूल्यभेद
   (C) प्रथम प्रमाण मूल्यभेद
   (D) जेव्हा मूल्यभेद केला जात नाही

12. पीगुप्रणीत अर्थसहाय्य :
   (A) बाह्यता असतांना असू शकत नाही
   (B) म्हणजेच पीगुप्रणीत कर असतात
   (C) पीगुप्रणीत डॉलरमधे मोजले जाते
   (D) उत्पादनाला सामाजिकदृष्ट्या इष्टतम उत्पादनाच्या पातळीकडे नेतात.

13. In Tobin's portfolio balance approach to money, the indifference curve of plungers are necessarily :

(A) Negatively sloped and concave

(B) Positively sloped and convex

(C) Positively sloped and concave

(D) Negatively sloped and convex

14. Which of the following has more elastic demand ?

(A) A commodity without substitutes

(B) A commodity with close substitutes

(C) A commodity on which a small fraction of income is spent

(D) A commodity the use of which cannot be postponed

13. टोबीनच्या पैशाच्या रोखासंग्रह दृष्टीकोनातील मुसळी मारणाऱ्या (धोका पत्करायला आवडणाऱ्या) व्यक्तीचे समवृत्तीवक्र अवश्यमेव ............ असे असतात.

(A) उणे प्रवणतेचे आणि (आरंभस्थानाशी) आंतर्वक्र

(B) धन प्रवणतेचे आणि (आरंभस्थानाशी) बहिर्वक्र

(C) धन प्रवणतेचे आणि (आरंभस्थानाशी) आंतर्वक्र

(D) उणे प्रवणतेचे आणि (आरंभस्थानाशी) बहिर्वक्र

14. खालीलपैकी कोणत्या वस्तूची मागणी अधिक लवचीक असते ?

(A) ज्या वस्तूला पर्यायी वस्तू नसतात

(B) ज्या वस्तूला जवळचे पर्याय असतात

(C) ज्या वस्तूवर उत्पन्नाचा थोडा भाग खर्च केला जातो

(D) ज्या वस्तूचा उपभोग लांबणीवर टाकता येत नाही

15. The marginal revenue of a monopolist facing linear demand curve approaches price when demand elasticity :

(A) approaches zero

(B) becomes negative

(C) approaches infinity

(D) approaches one

16. (*i*) Income effect of a price change is always positive.

(*ii*) Substitution effect of a price change is always in the opposite direction of price change (negative).

(A) Statement (*i*) is true but not (*ii*)

(B) Statement (*ii*) is true but not (*i*)

(C) Both statements (*i*) and (*ii*) are true

(D) Both statements (*i*) and (*ii*) are false

15. रेषीय मागणीवक्र असणाऱ्या मक्तेदारी उद्योगसंस्थेची सीमान्त प्राप्ती तेव्हा किंमतीएवढी होते जेव्हा मागणीची लवचिकता ही :

(A) शून्याकडे जाते

(B) उणे होते

(C) अनंताकडे जाते

(D) 1कडे जाते

16. (*i*) किंमत बदलाचा उत्पन्न परिणाम नेहमीच धन असतो

(*ii*) किंमत बदलाचा पर्यायता परिणाम नेहमीच किंमत बदलाच्या विरुद्ध दिशेने जाणारा (ऋण) असतो

(A) विधान (*i*) सत्य पण (*ii*) नाही

(B) विधान (*ii*) सत्य पण (*i*) नाही

(C) विधान (*i*) आणि (*ii*) दोन्ही सत्य

(D) विधान (*i*) आणि (*ii*) दोन्ही असत्य

17. Generally under monopoly the cross-elasticity of demand with other goods or services is :

(A) very high

(B) moderate

(C) very low

(D) unity

18. Pure oligopoly is one where :

(A) There are many firms producing homogeneous product

(B) There are few firms producing homogeneous product

(C) There are many firms producing differentiated product

(D) There are few firms producing differentiated product

19. Market mechanism are unlikely to provide :

(A) Prices

(B) Non-rival goods efficiently

(C) Supply and demand

(D) Equilibrium

17. सर्वसाधारणपणे मक्तेदारीमधे उत्पादित केलेल्या वस्तूची इतर वस्तू-सेवांच्या संदर्भातील छेदक लवचिकता ही :

(A) खूप जास्त असते

(B) मध्यम असते

(C) खूप कमी असते

(D) एक असते

18. निर्भेळ अल्पजनाधिकार म्हणजे असा बाजार ज्यात ............

(A) खूप उद्योगसंस्था एकजिनसी वस्तूचे उत्पादन करतात

(B) कमी उद्योगसंस्था एकजिनसी वस्तूचे उत्पादन करतात

(C) खूप उद्योगसंस्था विभेदित वस्तूंचे उत्पादन करतात

(D) कमी उद्योगसंस्था विभेदित वस्तूंचे उत्पादन करतात

19. बाजारयंत्रणा खालीलपैकी कुठली गोष्ट देऊ शकत नाही ?

(A) किंमती

(B) अस्पर्धा वस्तू कार्यक्षमतेने

(C) पुरवठा आणि मागणी

(D) समतोल

20. In the long-run competitive equilibrium, the theory predicts that :

(A) TC = TR and MC = MR

(B) Firms operate at maximum average total cost

(C) There is an incentive for entry or exit of firms

(D) TC ≠ TR and MC ≠ MR

21. "Excess capacity" and selling costs are the essential characteristic of the firm in market of :

(A) Monopoly

(B) Perfect competition

(C) Monopolistic competition

(D) Pure competition

20. पूर्ण स्पर्धेतील दीर्घकालीन समतोलाबाबत सिद्धांत असे भाकीत करतो :

(A) एकूण खर्च = एकूण प्राप्ती आणि सीमान्त खर्च = सीमान्त प्राप्ती

(B) उद्योगसंस्था महत्तम सरासरी एकूण खर्च पातळीचे उत्पादन करतात

(C) उद्योगात बाहेरून उद्योग संस्थाचा प्रवेश आणि उद्योगातून उद्योगसंस्थांचे बहिर्गमन अशी प्रवृत्ती असते

(D) एकूण खर्च ≠ एकूण प्राप्ती आणि सीमान्त खर्च ≠ सीमान्त प्राप्ती

21. 'अतिरिक्त क्षमता' आणि विक्री खर्च हे कोणत्या बाजारातील उद्योगसंस्थांचा गुणविशेष आहे ?

(A) मक्तेदारी

(B) पूर्ण स्पर्धा

(C) मक्तेदारीयुक्त स्पर्धा

(D) शुद्ध स्पर्धा

22. If the production of a good creates negative externalities the private market will produce :
    (A) too much of the quantity at too low a price
    (B) too much of the quantity at too high a price
    (C) too little of the quantity at too high a price
    (D) too little of the quantity at too low a price

22. जर वस्तूच्या उत्पादनात ऋण बाह्यता असतील तर खाजगी बाजार :
    (A) वस्तूच्या खूपच जास्त मात्रांचे उत्पादन खूपच कमी किंमतीला करतील
    (B) वस्तूच्या खूपच जास्त मात्रांचे उत्पादन खूपच जास्त किंमतीला करतील
    (C) खूपच कमी मात्राचे उत्पादन खूपच जास्त किंमतीला करतील
    (D) खूपच कमी मात्राचे उत्पादन खूपच कमी किंमतीला करतील

23. The aggregate supply of land is :
    (A) Absolutely elastic
    (B) Absolutely inelastic
    (C) More than unit elastic
    (D) Relatively elastic

23. भूमीचा एकूण पुरवढा :
    (A) पूर्ण लवचीक असतो
    (B) पूर्ण अलवचीक असतो
    (C) एकपेक्षा जास्त लवचीक असतो
    (D) तुलनेने लवचीक असतो

24. Opportunity costs are also known as ..........
    (A) spill-over costs
    (B) money costs
    (C) alternative costs
    (D) external costs

24. वैकल्पिक खर्च हे या नावानेही ओळखले जातात :
    (A) सांडवण खर्च
    (B) मुद्रा खर्च
    (C) पर्यायी खर्च
    (D) बाह्य खर्च

25. The term fiscal federalism was introduced by :

(A) Dalton

(B) Seligman

(C) Musgrave

(D) Amartya Sen

26. The basis of corporate tax is :

(A) Total turnover of the firm

(B) Profit after distribution of dividend

(C) Profit before distribution of dividend

(D) Capital employed in the firm

27. The MPC of a consumer is 0.80 and APC is 0.40, then the income elasticity would be :

(A) 0.5

(B) 2.00

(C) 1.20

(D) 0.40

25. राजकोषीय संघराज्यवाद ही संज्ञा यांनी मांडली :

(A) डाल्टन

(B) सेलिग्मन

(C) मसग्रेव्ह

(D) अमर्त्य सेन

26. निगम कराचा आधार हा असतो :

(A) कंपनीची एकूण उलाढाल

(B) लाभांश वितरणानंतर शिल्लक राहिलेला नफा

(C) लाभांश वितरणाआधीचा नफा

(D) कंपनीने समुपयोजित केलेले भांडवल

27. उपभोक्त्याची सिमांत उपभोग प्रवृत्ती 0.80 आणि सरासरी उपभोग प्रवृत्ती 0.40 असेल, तर उत्पन्न लवचीकता :

(A) 0.5

(B) 2.00

(C) 1.20

(D) 0.40

28. The number of telephone calls received in 293 successive one-minute intervals are shown as follows :

| No. of Calls | Frequency |
|---|---|
| 0 | 10 |
| 1 | 28 |
| 2 | 35 |
| 3 | 45 |
| 4 | 65 |
| 5 | 52 |
| 6 | 32 |
| 7 | 12 |
| 8 | 14 |

The mean and modal number of calls are :

(A) 3.89, 6

(B) 3.89, 4

(C) 6, 3.89

(D) 4, 3.89

28. एक मिनिटाच्या अंतराने 293 वेळा आलेल्या टेलिफोन कॉलस्‌ची संख्या खाली दिली आहे :

| कॉलस्‌ची संख्या | वारंवारता |
|---|---|
| 0 | 10 |
| 1 | 28 |
| 2 | 35 |
| 3 | 45 |
| 4 | 65 |
| 5 | 52 |
| 6 | 32 |
| 7 | 12 |
| 8 | 14 |

टेलीफोन कॉल्सची सरासरी आणि बहुलक असा आहे :

(A) 3.89, 6

(B) 3.89, 4

(C) 6, 3.89

(D) 4, 3.89

29. If the coefficient of correlation between X and Y is –1 or +1 and $a$, $b$ and $c$ are constants, then X and Y are connected by which of the following relations :

(A) $\frac{aX}{bY} = c$

(B) $aX + bY = c$

(C) $\frac{c}{aX} = aY$

(D) $\frac{c}{aY} = aX$

29. जर X आणि Y यामधील सहसंबंध सहगुणक –1 किंवा +1 असेल आणि $a$, $b$, $c$ ही स्थिर पदे असतील, तर X आणि Y हे खालीलपैकी कोणत्या संबंधाने बनलेले असतील ?

(A) $\frac{aX}{bY} = c$

(B) $aX + bY = c$

(C) $\frac{c}{aX} = aY$

(D) $\frac{c}{aY} = aX$

30. Which relationship between the three means is *correct* ?

(A) A.M. $\geq$ G.M. $\geq$ H.M.

(B) H.M. $\geq$ G.M. $\geq$ A.M.

(C) G.M. $\geq$ A.M. $\geq$ H.M.

(D) A.M. = G.M. $\leq$ H.M.

30. तीन सरासरी मधील कोणता संबंध बरोबर आहे ?

(A) A.M. $\geq$ G.M. $\geq$ H.M.

(B) H.M. $\geq$ G.M. $\geq$ A.M.

(C) G.M. $\geq$ A.M. $\geq$ H.M.

(D) A.M. = G.M. $\leq$ H.M.

31. The formula for constructing index using Laspeyres method is :

(A) $P_{01} = \frac{\Sigma p_0 q_0}{\Sigma p_1 q_1} \times 100$

(B) $P_{01} = \frac{\Sigma p_1 q_1}{\Sigma p_0 q_1} \times 100$

(C) $P_{01} = \frac{\Sigma p_1 q_0}{\Sigma p_0 q_0} \times 100$

(D) $P_{01} = \frac{p_1 \Sigma q_1}{p_0 \Sigma q_0} \times 100$

32. When $\beta_2$ is greater than 3, the curve will be :

(A) Mesokurtic

(B) Platykurtic

(C) Demikurtic

(D) Leptokurtic

33. The name of the economist who first defined the concept of shadow prices is :

(A) Rosenstein Rodan

(B) H. Leibenstein

(C) J. Tinbergen

(D) G. Myrdal

31. लॅस्पेयर्स निर्देशांकांची मोजणी खालील सूत्रानुसार केली जाते :

(A) $P_{01} = \frac{\Sigma p_0 q_0}{\Sigma p_1 q_1} \times 100$

(B) $P_{01} = \frac{\Sigma p_1 q_1}{\Sigma p_0 q_1} \times 100$

(C) $P_{01} = \frac{\Sigma p_1 q_0}{\Sigma p_0 q_0} \times 100$

(D) $P_{01} = \frac{p_1 \Sigma q_1}{p_0 \Sigma q_0} \times 100$

32. जेव्हा $\beta_2$ हा 3 पेक्षा जास्त असतो, तेव्हा वक्र हा असा असतो :

(A) मेसोकुर्टिक

(B) प्लेटिकुर्टिक

(C) डेमीकुर्टिक

(D) लेप्टोकुर्टिक

33. छाया किंमत या संकल्पनेची कोणत्या अर्थशास्त्रज्ञाने प्रथम व्याख्या केली ?

(A) रोझेंस्टाइन रोडान

(B) एच. लाइबेनस्टाइन

(C) जे. टिनबर्जेन

(D) जी. मिर्डाल

34. HDI is constructed with reference to :

(*i*) Life expectancy of birth

(*ii*) Real GDP/per capita

(*iii*) Inflation index

(*iv*) Nominal GDP

The correct answer is :

(A) (*i*) and (*ii*)

(B) (*ii*) and (*iii*)

(C) (*iii*) and (*iv*)

(D) (*iv*)

35. Harrod-Domar model of economic growth is based upon :

(*i*) Warranted growth rate

(*ii*) Investment growth rate

(*iii*) Productivity growth rate

(*iv*) Natural growth rate

The correct answer is :

(A) (*i*) and (*iii*)

(B) (*iii*) and (*ii*)

(C) (*iv*)

(D) (*i*) and (*iv*)

34. HDI ची मोजणी खालील बार्बीच्या आधारे केली जाते :

(*i*) जन्मवेळची आयुर्मान अपेक्षा

(*ii*) दरडोई वास्तव स्थूल देशांतर्गत उत्पादन

(*iii*) भावफुगवटा निर्देशांक

(*iv*) नामित स्थूल देशांतर्गत उत्पादन

योग्य उत्तर म्हणजे :

(A) (*i*) आणि (*ii*)

(B) (*ii*) आणि (*iii*)

(C) (*iii*) आणि (*iv*)

(D) (*iv*)

35. आर्थिक अभिवृद्धीचे हॅरड-डोमर प्रतिमान यावर आधारित आहे :

(*i*) शक्यकमात वृद्धीदर

(*ii*) गुंतवणूक वृद्धीदर

(*iii*) उत्पादकता वृद्धीदर

(*iv*) नैसर्गिक वृद्धीदर

योग्य उत्तर म्हणजे :

(A) (*i*) आणि (*iii*)

(B) (*iii*) आणि (*ii*)

(C) (*iv*)

(D) (*i*) आणि (*iv*)

36. Adam Smith argued in favour of a policy of :

(A) Protection

(B) Free trade

(C) Self-sufficiency

(D) Minimum welfare

37. Economic growth results from an increasing :

(A) Propensity to consume

(B) Propensity to import

(C) Propensity to export

(D) Propensity to save

38. In 'Global Hunger Index' 2013 report by International Food Policy Research Institute (IFPRI), India has been placed at :

(A) 65th Rank

(B) 66th Rank

(C) 63rd Rank

(D) 68th Rank

36. ॲडम स्मिथ यांनी या धोरणाच्या बाजूने युक्तिवाद केला :

(A) संरक्षण

(B) मुक्त व्यापार

(C) स्वयंनिर्भरता

(D) किमान कल्याण

37. खालीलपैकी कोणत्या बाबतीत वृद्धी झाल्यास आर्थिक अभिवृद्धी होते ?

(A) उपभोग प्रवृत्ती

(B) आयात करण्याची प्रवृत्ती

(C) निर्यात करण्याची प्रवृत्ती

(D) बचत करण्याची प्रवृत्ती

38. 2013च्या आंतरराष्ट्रीय अन्नधान्य धोरण संशोधन संस्थेच्या (IFPRI) वैश्विक उपासमार निर्देशांक अहवालानुसार भारताचा क्रम इतका आहे :

(A) 65वा

(B) 66वा

(C) 63वा

(D) 68वा

39. The Economist who stressed the role of the entrepreneur in development was :
   (A) Hirschman
   (B) Nurkse
   (C) Rosenstein Rodan
   (D) Schumpeter

39. विकासप्रक्रियेत असणारी उद्योजकाची भूमिका कोणत्या अर्थशास्त्रज्ञाने अधोरेखित केली ?
   (A) हर्शमन
   (B) नर्क्से
   (C) रोझेंस्टाइन रोडान
   (D) शूंपीटर

40. The concept of organic composition of capital is given by :
   (A) Marshall
   (B) J.S. Mill
   (C) Karl Marx
   (D) Adam Smith

40. भांडवलाच्या सेंद्रिय संरचनेची संकल्पना ...... याने मांडली.
   (A) मार्शल
   (B) जे.एस. मिल
   (C) कार्ल मार्क्स
   (D) ॲडम स्मिथ

41. Which one of the following policies will not be useful for bringing the economy out of unemployment equilibrium ?
   (A) a rise in minimum wage rate
   (B) a rise in government expenditure
   (C) a rise in taxes
   (D) a rise in money supply

41. खालीलपैकी कोणते धोरण बेरोजगाराच्या समतोलाच्या परिस्थितीतून अर्थव्यवस्थेस बाहेर काढण्यास उपयुक्त ठरत नाही ?
   (A) किमान वेतन दरातील वाढ
   (B) सरकारी खर्चातील वाढ
   (C) करातील वाढ
   (D) पैशाच्या पुरवठ्यातील वाढ

42. If the ratio of currency to demand deposits ratio increases, the money multiplier value :
    (A) increases
    (B) decreases
    (C) does not change
    (D) change in equal proportion

43. In classical macro-economic model, automatic full employment is ensured if :
    (A) Excess demand in labour market leads to rising real wage
    (B) Excess demand in labour market leads to falling real wage
    (C) Excess supply in labour market leads rising real wage
    (D) Real wage does not change whether there is excess demand or supply in labour market

42. जर चलन आणि मागणी ठेवी यातील गुणोत्तर वाढले, तर पैसा गुणकाचे मूल्य :
    (A) वाढते
    (B) घटते
    (C) बदलत नाही
    (D) समप्रमाणात बदलते

43. सनातनवादी समग्र आर्थिक प्रतिमानात, स्वयंचलित पूर्ण रोजगाराची खात्री असते जर :
    (A) श्रमिक बाजारातील अतिरिक्त मागणीमुळे वास्तव मजूरीत वाढ होत असेल
    (B) श्रमिक बाजारातील अतिरिक्त मागणीमुळे वास्तव मजूरीत घट होत असेल
    (C) श्रमिक बाजारातील अतिरिक्त पुरवठामुळे वास्तव मजूरीत वाढ होत असेल
    (D) श्रमिक बाजारातील अतिरिक्त मागणी आणि पुरवठामुळे वास्तव मजूरीत बदल होत नसेल

44. The imposition of an import tariff by a nation :

(A) Usually improves the nation's terms of trade and increases the volume of trade

(B) Worsens the nation's terms of trade but increases the volume of trade

(C) Worsens the nation's terms of trade and reduces the volume of trade

(D) Usually improves the nation's terms of trade but reduces the volume of trade

45. Until 1971, the SDR had the same value as :

(A) an ounce of gold

(B) a pound of gold

(C) a US dollar

(D) a British pound

44. देशाने आयात प्रशुल्क लादल्यास :

(A) सामान्यतः देशाच्या मूल्यतुल्यता दरामधे सुधारणा घडवून आणतो आणि व्यापाराची उलाढाल वाढवतो

(B) देशाच्या मूल्यतुल्यता दरात घट घडवून आणतो आणि व्यापाराची उलाढाल वाढवतो

(C) देशाच्या मूल्यतुल्यता दरात घट घडवून आणतो आणि व्यापाराची उलाढाल घटवतो

(D) सामान्यतः देशाच्या मूल्यतुल्यता दरात सुधारणा घडवून आणतो आणि व्यापाराची उलाढाल घटवतो

45. 1971 पर्यंत SDR चे मूल्य याच्या समान होते :

(A) एक औंस सोने

(B) एक पौंड सोने

(C) एक यू.एस. डॉलर

(D) एक ब्रिटिश पौंड

46. The classical theory of comparative advantage is based on :

(A) the labour theory of value

(B) law of diminishing returns

(C) law of increasing returns

(D) tariffs

46. सनातन तौलनिक लाभ सिद्धान्त यावर आधारित आहे :

(A) मूल्याचा श्रम सिद्धान्त

(B) घटत्या प्रत्यायांचा नियम

(C) वाढत्या प्रत्यायांचा सिद्धांत

(D) प्रशुल्क

47. Which one of the following is the immediate effect of tariff ?

(A) fall in production

(B) rise in production

(C) fall in price

(D) rise in price

47. प्रशुल्काचा तात्काळ होणारा परिणाम कोणता आहे ?

(A) उत्पादनात घट

(B) उत्पादनात वाढ

(C) किंमतीत घट

(D) किंमतीत वाढ

48. Stability in the Keynesian cross model requires :

(A) MPC to be equal to 1

(B) MPC to be less than 1 but greater than zero

(C) MPC to be greater than 1

(D) MPC to be non-negative

48. केन्सप्रणित क्रॉस प्रतिमानात स्थिरतेसाठी ही अट आवश्यक असते :

(A) सीमान्त उपभोग प्रवृत्ती एक हवी

(B) सीमान्त उपभोग प्रवृत्ती एकापेक्षा कमी परंतु शून्यापेक्षा जास्त हवी

(C) सीमान्त उपभोग प्रवृत्ती एकापेक्षा जास्त हवी

(D) सीमान्त उपभोग प्रवृत्ती अऋणात्मक असावी

49. A long-run Phillips curve will show no trade-off between unemployment rate and inflation under which of the following circumstances ?

(A) Inflation rate does not adjust

(B) Inflation rate always has an upward trend

(C) Inflation rate adjusts the following adaptive expectation

(D) Inflation rate is independent of unemployment rate

50. Match the following and select the correct answer from the codes given below :

| | | | |
|---|---|---|---|
| (*a*) | Liquidity trap | (1) | Edmund Phelps |
| (*b*) | Adaptive Expectations | (2) | Alfred Pigou |
| (*c*) | Wealth effect | (3) | John Maynard Keynes |
| (*d*) | Restatement of quantity theory | (4) | Milton Friedman |

*Codes* :

(A) (*a*)—(1), (*b*)—(2), (*c*)—(3), (*d*)—(4)

(B) (*a*)—(3), (*b*)—(4), (*c*)—(1), (*d*)—(2)

(C) (*a*)—(4), (*b*)—(3), (*c*)—(2), (*d*)—(1)

(D) (*a*)—(3), (*b*)—(1), (*c*)—(2), (*d*)—(4)

49. दीर्घकालीन फिलीप्सचा वक्र, बेरोजगारीचा दर आणि भावफुगवटा यात खालीलपैकी कोणत्या परिस्थितीत सममूल्यांकन दर्शवणार नाही ?

(A) भावफुगवट्याच्या दरात जुळणी होत नाही

(B) भावफुगवट्याच्या दरात नेहमीच उर्ध्वगामी कल असतो

(C) अनुकूलक (जुळणी होणाऱ्या) अपेक्षांना अनुसरून भावफुगवट्याच्या दरात जुळणी होते

(D) भावफुगवटा व बेरोजगारी यांचे दर स्वतंत्र असतात

50. जोड्या लावा आणि खाली दिलेल्या पर्यायातून योग्य उत्तर निवडा :

| | | | |
|---|---|---|---|
| (*a*) | रोखता सापळा | (1) | एडमंड फेल्प्स |
| (*b*) | अनुकूलक अपेक्षा | (2) | अल्फ्रेड पिगु |
| (*c*) | संपत्ती परिणाम | (3) | जॉन मेनॉर्ड केन्स |
| (*d*) | पैशाच्या संख्या सिद्धान्ताची पुनर्मांडणी | (4) | मिल्टन फ्रीडमन |

**पर्याय :**

(A) (*a*)—(1), (*b*)—(2), (*c*)—(3), (*d*)—(4)

(B) (*a*)—(3), (*b*)—(4), (*c*)—(1), (*d*)—(2)

(C) (*a*)—(4), (*b*)—(3), (*c*)—(2), (*d*)—(1)

(D) (*a*)—(3), (*b*)—(1), (*c*)—(2), (*d*)—(4)

ROUGH WORK